साप्ताहिक
# हॅलो न्यूज

e-mail-hellonewskrd@gmail.com

संपादक : विशाल वामन पाटील

पोस्ट परवाना :
KRDDN/026/2026-28

HELLO NEWS

* सातारा * वर्ष १ * अंक १८ * मराठी * सोमवार २८ सप्टेंबर ते ४ ऑक्टोबर २०२६ * PRGI. MHMAR/26/A3624 * पाने ४ * किंमत ३ रुपये

* Satara * Year 1 * Volume 18 * Marathi * Monday 28 September to 4 October 2026 * PRGI. MHMAR/26/A3624 * Page 4 * Price 3 Rs.

# राज्यातील २६५ तालुक्यात दुष्काळ जाहीर

## राज्याच्या ७५ टक्के भागाला तातडीने दिलासा, कर्जवसुलीस स्थगिती, परीक्षा फी माफीसह मुख्यमंत्र्यांचे १२ मोठे निर्णय



**मुंबई (हॅलो न्यूज)**

दुष्काळी परिस्थितीत राज्यातील शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी आमच्या मदतीच्या केंद्रस्थानी आहे. त्यांना दिलासा देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जाणार आहेत. आम्ही शेतकरी बांधवांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत. या आव्हानावर मात करण्यासाठी आपण सर्व एकजूटीने प्रयत्न करूया, असा निर्धार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे. राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. या तालुक्यांतील शेतकरी, विद्यार्थी, शेतमजूर, नागरिक आणि पशुधनाला दिलासा देण्यासाठी १२ उपाययोजना व सवलती लागू करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. याबाबतचा शासन निर्णय जाहीर झाल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या तालुक्यांमधील परिस्थितीबाबत तत्काळ पंचनामे सुरु करावेत असे निर्देश संबंधित जिल्हाधिकारी यांना दिले आहेत.पावसाअभावी शेतकऱ्यांना अडचणींना सामोरे जावे लागत आहे. दुष्काळी परिस्थिती जाहीर झालेल्या तालुक्यांमध्ये तत्काळ सर्व्हेक्षण करावे लागणार आहे. यासाठी महसूल विभाग, कृषि तसेच संबंधित सर्व यंत्रणांनी संवेदनशीलतेने आणि समन्वयाने काम करावे. त्यासाठी क्षेत्रीय स्तरावर सुसंवाद आणि संपर्क ठेवावा. शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी या कामाला प्राधान्य द्यावे, असे निर्देशही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. सर्व्हेक्षण करताना पिकांची स्थिती दर्शवणारे छायाचित्रे व जीपीएस कोऑडीनेटद्वारे पिक परिस्थितीचा अहवाल सादर केला जाणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकताच राज्यातील दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी दौरा केला. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पाहणी केली. शेतकरी बांधवांशी आस्थेवाईक संवाद साधला. त्यांच्या अडी-अडचणी समजून घेतल्या. दुष्काळी परिस्थितीबाबत तातडीने निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासित केले होते. त्या अनुषंगाने आज दुष्काळ व्यवस्थापन संहिता २०१६ नुसार राज्यातील दुष्काळी परिस्थितीचे मूल्यांकन करण्याबाबत शासन निर्णय जाहीर करण्यात आला. राज्याचे कृषि आयुक्त यांनी खरीप २०२६ च्या हंगामाचा आढावा घेऊन राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळी परिस्थिती असल्याचा अहवाल सादर केला. त्यामुळे आता या राज्यातील तालुक्यामध्ये जून ते आज पर्यंत या कालावधीतील पर्जन्याची तूट व अन्य घटकांनी प्रभावित झालेल्या २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळी परिस्थितीबाबत दुष्काळाबाबतच्या १ (प्रथम कळ) अनुषंगाने पंचनामे करण्यात येणार आहेत. सर्व्हेक्षण केलेल्या क्षेत्रातील पिकांची स्थिती दर्शवणारे छायाचित्र व जीपीएस कोऑडीनेट संकलन करून पिक परिस्थितीचा अहवाल तयार करण्यात येणार आहे.

## सातारा जिल्ह्यातील ६ तालुक्यात दुष्काळ जाहीर

### जिल्हाधिकाऱ्यांना तातडीने पंचनामे करण्याचे आदेश

**सातारा (हॅलो न्यूज)**

महाराष्ट्र सरकारने खरीप हंगाम २०२६ मधील पर्जन्याची तूट आणि घटलेल्या पीक परिस्थितीची गंभीर दखल घेत राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ (ढीळससशी-१)घोषित केला आहे. यामध्ये सातारा जिल्ह्यातील ६ तालुक्यांचा समावेश असून मदत व पुनर्वसन विभागाने २५ सप्टेंबर २०२६ रोजी याबाबतचा अधिकृत शासन निर्णय जारी केला आहे.

दुष्काळग्रस्त भागातील शेतकरी आणि नागरिकांना दिलासा देण्यासाठी राज्य सरकारने १२ प्रमुख सवलती आणि विविध उपायोजना तातडीने लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. कृषी आयुक्तांनी २४ सप्टेंबर २०२६ रोजी सादर केलेल्या अहवालानुसार, जून महिन्मापासून राज्यात झालेला अपुरा पाऊस आणि इतर प्रतिकूल घटकांमुळे सातारा जिल्ह्यासह राज्यातील २६५ तालुक्यांत दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने दुष्काळ व्यवस्थापन संहिता २०१६ मधील निममांनुसार ही कारवाई केली आहे. सातारा जिल्ह्यातील खालील ६ तालुक्यांमध्ये प्रथम कळ १) अंतर्गत दुष्काळी परिस्थिती घोषित करण्यात आली आहे : माण, खटाव, फलटण, कोरेगाव, दहीवडी / खंडाळा (जिल्ह्यातील टंचाईग्रस्त भाग), सातारा (काही महसुली मंडळे)

शासन निर्णमानुसार, सातारा जिल्ह्याचे जिल्हाधिकारी व प्रशासनाने दुष्काळग्रस्त तालुक्यांमध्ये तातडीने पिकांचे पंचनामे सुरू करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. सर्व्हेक्षण केलेल्या पिकांचे छायाचित्र आणि जीपीएस कोऑर्डिनेट नाला त्वरित सादर करण्याच्या सूचना देण्मात आल्या आहेत. या अहवालानंतर शेतपिकांच्या नुकसानीची थेट आर्थिक मदत स्वतंत्र शासन निर्णयाद्वारे जाहीर केली जाईल.

# कराड तालुक्यात दुष्काळ जाहीर करा

### कोरडवाहू शेतीला पावसाच्या लहरीपणाचा फटका; आजी-माजी लोकप्रतिनिधींचा निषेध : अशोकराव थोरात

**मलकापूर (हॅलो न्यूज)**

कराड तालुक्यातील खरीप हंगामातील पिकांना अपुऱ्या पावसाचा मोठा फटका बसला असून, तालुक्यात पाणीटंचाई व दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. मात्र, शासनाने कराड तालुका दुष्काळग्रस्त जाहीर केलेला नाही. या पार्श्वभूमीवर तालुक्यातील आजी-माजी लोकप्रतिनिधींचा निषेध करून कराड तालुका दुष्काळग्रस्त जाहीर करावा, अशी मागणी शेतीमित्र अशोकराव थोरात यांनी केली आहे.



महाराष्ट्रातील २६५ तालुक्यांत दुष्काळ जाहीर केल्याबद्दल मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांचे आभार मानताना उर्वरित तालुक्यांमध्येही पावसाच्या टंचाईचा गांभीर्याने विचार करण्याची गरज असल्याचे थोरात यांनी सांगितले. पेरणीच्या वेळी आवश्यक पाऊस झाला नाही. त्यानंतर झालेला पाऊस अवेळी व एकाच वेळी मोठ्या प्रमाणात झाल्याने पाणी वाहून गेले. आता खरीप पिके भरण्याच्या अवस्थेत असताना पाऊस नसल्याने शेतकरी अडचणीत सापडला आहे.

कराड तालुक्यातील उत्तर व दक्षिण विभागात सोयाबीन, भुईमूग, हायब्रीड ज्वारी, मूग, उडीद, चवळी व मका ही पिके फुलोऱ्यात असताना पावसाची कमतरता जाणवली. आता पिके भरण्याच्या काळातही पाऊस नसल्याने उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता आहे. तालुक्यात केवळ ३५ ते ४० टक्के शेती बागायती असून, उर्वरित ६० ते ६५ टक्के शेती कोरडवाहू आहे. त्यामुळे पावसावर अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसणार असल्याचे थोरात यांनी स्पष्ट केले.

अडसाली उसाच्या लागवडीमध्ये वरंब्यावर भुईमूग, सोयाबीन, मूग, उडीद व चवळीची पिके घेतली जातात. उसाला पाणी दिले तरी ते वरंब्यावरील पिकांपर्यंत पुरेसे पोहोचत नसल्याने उत्पादनात ५० ते ६० टक्के घट येण्याची शक्यता आहे. अपुऱ्या पावसामुळे रब्बी हंगामासाठीही पुरेसे पाणी उपलब्ध होणार नाही. पावसाचा कालावधी ऑक्टोबरअखेरपर्यंत वाढला नाही, तर उन्हाळ्यात उसासह अन्य पिके वाळण्याचा धोका असून, शेतकरी आर्थिक संकटात सापडेल.

उसाचे सरासरी उत्पादन घटण्याची शक्यता असतानाच सहकारी व खासगी साखर कारखाने तसेच गुऱ्हाळचालकांकडून ऊस उत्पादक शेतकऱ्यांची पिळवणूक होण्याची भीती आहे. त्यामुळे आगामी काळात शेतकऱ्यांसमोरील संकट अधिक गंभीर होणार आहे. मोठ्या सहकारी संस्थांच्या निवडणुकांच्या राजकारणात शेतकऱ्यांच्या व्यथा दुर्लक्षित होऊ नयेत, अशी अपेक्षाही थोरात यांनी व्यक्त केली.

# दुष्काळाच्या काळात अधिकाऱ्यांनी मुख्यालय सोडू नका

### विनापरवाना गैरहजर राहिल्यास कठोर कारवाई : जिल्हाधिकाऱ्यांच्या पूर्वपरवानगीशिवाय रजा नाही; आपत्ती व्यवस्थापन कायद्यानुसार फौजदारी कारवाईचे निर्देश

**सातारा (हॅलो न्यूज)**

सातारा जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रात दुष्काळसदृश गंभीर परिस्थिती निर्माण झाली असून, पाणीटंचाई, चाराटंचाई आणि पिकांचे नुकसान यामुळे शेतकरी बांधवांसमोर आर्थिक व मानसिक संकट उभे राहिले आहे. या पार्श्वभूमीवर शेतकरी आत्महत्यांसारख्या दुर्दैवी घटना टाळण्यासाठी शासन स्तरावर कर्जमाफी, विम्याचे वाटप, पीक कर्जाचे पुनर्गठन तसेच विविध आर्थिक सवलतींची अंमलबजावणी करण्यात येत आहे. या उपाययोजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रशासनाने अधिकाऱ्यांना कठोर निर्देश दिले आहेत. दुष्काळ निवारणाच्या कामांना सर्वोच्च प्राधान्य देऊन सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी मुख्यालयी पूर्णवेळ हजर राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत. कोणत्याही अधिकाऱ्यास पूर्वपरवानगीशिवाय मुख्यालय सोडण्यास मनाई करण्यात आली आहे. शासकीय नियमानुसार रजा मंजूर करण्याचा अधिकार अन्य कोणत्याही अधिकाऱ्याकडे असला तरी, सध्याच्या दुष्काळी व आपत्तीजन्य परिस्थितीत संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष यांच्या पूर्वपरवानगीशिवाय कोणत्याही प्रकारची रजा मंजूर करता येणार नाही. अतितातडीची वैद्यकीय रजाही याला अपवाद राहणार नाही.

कोणत्याही अधिकाऱ्याने परस्पर अथवा आपल्या मूळ प्रशासकीय प्रमुखांकडून रजा मंजूर करून घेऊन मुख्यालयातून गैरहजर राहू नये. रजेचा अर्ज संबंधित कारणांसह व विभागप्रमुखांच्या अभिप्रायासह थेट जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

## संपादकीय

# काँग्रेस पुन्हा मैदानात...

युपीआय व्यवहारांसाठी सामान्य ग्राहकांकडून नव्हे तर व्यापाऱ्यांकडून नाममात्र कर वसूल करण्याच्या मुद्द्यावरून दिमागी नक्षली टोळीचे सरदार राहुल गांधी पुठ्ठयाची तलवार घेऊन पुन्हा मैदानात आले आहेत. हा कर रद्द करा, अमेरिकेसमोर झुकू नका, ताठ कणा दाखवा, अशी शाब्दिक फुलबाजी राहुल गांधींनी केली आहे. राजकारणात सत्ताधारी पक्षाला विरोधी पक्षाने विरोध करणे अभिप्रेतच आहे. संसदीय लोकशाहीचा हाच आत्मा आहे. मात्र विरोधकाची भूमिका बजावणाऱ्या नेत्याला पक्षाला तारतम्य नसेल, राजकीय आकलनशक्ती नसेल तर तो नेता आक्रस्ताळा बनून आपले हसे कसे करून घेतो याचे राहुल गांधी हे उत्तम उदाहरण आहे. मोदी सरकारच्या प्रत्येक निर्णयाला विरोध करून प्रसिद्धीचा झोत आपल्याकडे वळविण्याचा राहुल गांधी सातत्याने प्रयत्न करीत असतात. युपीआय व्यवहारांवर एमडीआर शुल्क लावण्याच्या निर्णयाबद्दल प्रतिक्रिया व्यक्त करताना राहुल गांधींनी सवयीप्रमाणे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर टीका केली. पंतप्रधान मोदी यांनी ताठ कणा दाखवावा, अमेरिकेसमोर झुकू नये आणि हे शुल्क रद्द करावे, असे वक्तव्य राहुल गांधींनी केले आहे. आपण आक्रमक विरोधी नेते आहोत हे दाखविण्याचा प्रयत्न करणाऱ्या राहुल गांधींना त्यासाठी बिनबुडाची वक्तव्ये करण्याची सवय लागली आहे. असे बोलल्यामुळे राहुल गांधींना सर्वोच्च न्यायालयापुढे माफी मागावी लागली आहे, तरीही त्यांची बेताल बडबड करण्याची सवय काही सुटत नाही. राफेल लढाऊ विमाने खरेदी मध्ये गैरव्यवहार झाल्याचा आरोप करताना राहुल गांधींनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबद्दल अत्यंत अवमानास्पद भाषा वापरली होती. कोणतेही पुरावे नसताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर आरोप केल्याबद्दल राहुल गांधींना सर्वोच्च न्यायालयापुढे नाक घासत माफी मागावी लागली होती.

युपीआय वरील शुल्काचे निमित्त करून राहुल गांधींनी नेहमीप्रमाणे खोटी नाटी माहिती पसरवून जनतेच्या मनात संभ्रम पसरविण्याचा प्रयत्न सुरु केला आहे. सरकारने ताठ कणा दाखवावा वगैरे वगैरे बाष्कळ बडबड करताना आपण २००४ ते २०१४ या काळात कितींदा ताठ कणा दाखवला , आपल्या पिताश्रींनी, आज्जीने कसा ताठ कणा दाखवत अमेरिकेपुढे, पाकिस्तानपुढे शरणागती पत्करली होती याचे इतिहासातील अनेक पुरावे राहुल गांधींना दाखवावे लागतील. अर्थात या पुरव्यांकडे राहुल गांधी सवयीप्रमाणे दुर्लक्ष करतील आणि आपली झूठ की गुंज सुरु करतील यात काही शंका नाही. २००४ ते २०१४ या काळात डॉ . मनमोहन सिंग यांचे सरकार सत्तेत असताना राहुल गांधी आणि त्यांच्या मातोश्री श्रीमती सोनिया गांधी यांच्याकडे सरकारचा रिमोट कंट्रोल होता. या दहा वर्षांत देशात पाकिस्तानच्या दहशतवाद्यांनी थैमान घातले होते. पाकिस्तानी दहशतवादी मनात येईल तेव्हा भारतात बॉम्बस्फोट करत होते. मनमोहन सरकार दहशतवाद्यांचा निषेध करण्याखेरीज काहीच करीत नव्हते. त्यामुळे पाकिस्तानने २६ नोव्हेंबर २००८ रोजी दहशतवादी पाठवून मुंबईवर हल्ला चढविला. मूठभर अतिरेक्यांनी त्यावेळी संपूर्ण देशाला वेठीस धरले होते. पाकिस्तानने एवढी मोठी आगळीक करूनही काँग्रेसच्या मनमोहन सरकारने त्याबद्दल निषेधाचे कागदी खलिते पाठ्वण्याखेरीज काहीही केले नाही. त्यावेळी राहुल गांधींना आपल्या मातोश्रींना, मनमोहन सिंग यांना ताठ कणा दाखवा आणि पाकिस्तानला धडा शिकवा, असे सांगण्याची हिम्मत दाखविता आली नव्हती. सप्टेंबर २०१३ मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेदरम्यान त्यावेळचे पाकिस्तानचे पंतप्रधान नवाझ शरीफ यांनी आपले पंतप्रधान डॉ . मनमोहन सिंग यांच्याबद्दल अवमानकारक वक्तव्य केल्यानंतर राहुल गांधींनी शरीफ यांचा निषेध करण्याचे धाडस दाखविले नव्हते. या आमसभेवेळी त्यावेळचे अमेरिकेचे अध्यक्ष बराक ओबामा भेटल्यानंतर मनमोहन सिंग यांनी पाकिस्तानकडून दहशतवाद्यांना केल्या जाणाऱ्या सहाय्याबद्दलचा मुद्दा उपस्थित केला होता. मनमोहन सिंग यांचे वागणे एखाद्या गावंढळ महिलेसारखे आहे, असे नवाझ शरीफ त्यावेळी म्हणाले होते. त्यावेळी राहुल गांधी, सोनिया गांधींनी मिठाची गुळणी धरली होती. त्यावेळी गुजरातचे मुख्यमंत्री असलेले नरेंद्र मोदी यांनी शरीफ यांच्या वक्तव्याचा कडक शब्दांत समाचार घेतला होता. राहुल गांधींचे पिताश्री राजीव गांधी पंतप्रधान असताना डिसेंबर १९८४ मध्ये भोपाळ वायू दुर्घटना घडली. या दुर्घटनेत हजारो सामान्य नागरिकांचा मृत्यू झाला. हजारो लोकांना कायमचे अपंगत्व आले. अनेकांची दृष्टी गेली. या वायू गळतीला कारणीभूत असलेल्या युनियन कार्बाइड या अमेरिकी कंपनीच्या विरोधात स्थानिक नागरिकांनी पोलिसांत रीतसर तक्रार दाखल केली. या तक्रारीची दखल घेत पोलीस अधिकारी युनियन कार्बाइडचे मुख्य कार्यकारी अधिकारी अँडर्सन यांना अटक करण्यासाठी गेल्यावर त्यांना दिल्लीतून आदेश गेले. अँडर्सन यांना अटक करण्याऐवजी त्यांना विशेष विमानाने दिल्लीला पाठवले गेले. दिल्लीहून अँडरसन मायदेशी परतले. हजारो निरपराधांचे जीव घेणाऱ्या कंपनीचा सर्वेसर्वा बिनबोभाट सुटला. हाच काँग्रेसचा ताठ कणा. १९७१ च्या बांगला मुक्ती संग्रामानंतर पाकिस्तानचे ९३ हजार युद्ध कैदी सोडण्यासाठी अमेरिकेने दबाव आणला होता. आपले युद्धकैदी मायदेशी परत आणा, पाकव्याप्त काश्मीर परत घ्या मगच पाकचे युद्धकैदी सोडा, अशी मागणी जनसंघातर्फे अटलबिहारी वाजपेयी यांनी केली होती. मात्र तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी पाकिस्तानचे ९३ हजार युद्धकैदी सोडून दिले. इतिहासात असे अनेक दाखले आहेत. हा इतिहास राहुल गांधींनी विसरू नये.

# ४ ऑक्टोबर रोजी माजी सैनिक मेळावा

**सातारा (हॅलो न्यूज)**

सातारा जिल्हयातील सर्व वीरमाता/ वीरपत्नी/वीरपिता, माजी सैनिक/माजी सैनिक विधवा पत्नी यांना कळविण्यात येते की, दि मराठा लाईट इन्फट्री रेजिमेंटल सेंटर, बेळगांव यांच्याद्वारे शिवाजी स्टेडियम, बेळगांव येथे दिनांक ४ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यात माजी सैनिकांच्या इतर समस्या आणि त्यांच्या पेन्शनशी संबंधित तक्रारीबाबत मार्गदर्शन तसेच समाधान करण्यात येईल, असे जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाकडून कळविण्यात आले आहे

# दुष्काळी तालुक्यातील शेतकऱ्यांच्या पाठीशी शासन खंबीरपणे उभे : पालकमंत्री शंभूराज देसाई

**सातारा (हॅलो न्यूज)**

माण, कोरेगाव व फलटण तालुक्यात या वर्षी कमी प्रमाणात पाऊस झाला आहे. यामुळे शेतकऱ्यांचे उभे पिक पाण्या अभावी करपून गेले आहे. शेतकऱ्यांनी खचून जावू नये. त्यांच्या पाठीशी शासन खंबीरपणे असून तातडीने पिक नुकसानीची मदत केली जाईल, असे आश्वासन पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी दिले.



पालकमंत्री श्री. देसाई यांनी कोरेगाव, फलटण व माण तालुक्यातील दुष्काळग्रस्त गावांमधील प्रत्यक्ष बांधावर जाऊन शेतामधील पिकांची पहाणी केली. या प्रसंगी विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

याप्रसंगी पालकमंत्री श्री. देसाई म्हणाले, एक ही बाधित शेतकरी पंचनाम्यापासून वंचित राहणार नाही याची सूचना प्रशासनाला देण्यात आलेली आहे. शासनाच्या सूचनेनुसारच आज मी शेतकऱ्यांच्या बांधावर प्रत्यक्ष पीक नुकसानीची पाहणी करत आहे. प्रशासनाला पंचनामे करण्याबरोबरच अहवाल तातडीने शासनाकडे सादर करण्याच्या सूचनाही देण्यात आलेल्या आहेत.

आज शेतकरी अडचणीत आहे त्यांना पुन्हा उभे करण्याचे काम शासन करीत आहे. तरी शेतकऱ्यांनी निराश न होता पुन्हा नव्या उमेदीने उभे राहावे शासन आपल्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे अशी ग्वाहीही पालकमंत्री श्री. देसाई यांनी दिली.

# तळबीडच्या जिल्हा परिषद शाळेचा १७० वा वाढदिवस उत्साहात

## माजी विद्यार्थ्यांकडून प्रिंटरची भेट; वृक्षारोपणातून जपला पर्यावरणाचा संदेश

**सातारा (हॅलो न्यूज)**

व्यक्ती, संस्था किंवा गावांचा वाढदिवस साजरा होताना आपण नेहमी पाहतो. मात्र तब्बल १७० वर्षांची ज्ञानपरंपरा जपणाऱ्या शाळेचा वाढदिवस साजरा करण्याची आगळीवेगळी संकल्पना कराड तालुक्यातील तळबीड येथे पाहायला मिळाली. तळबीड येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचा १७० वा वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात आला. कराड उत्तरचे आमदार मनोजदादा घोरपडे यांच्या उपस्थितीत केक कापून शाळेचा वाढदिवस साजरा करण्यात आला. यानिमित्ताने शाळेच्या परिसरात वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेशही देण्यात आला.



या कार्यक्रमास सरपंच मृणालिनी मोहिते, उपसरपंच विशाल मोहिते, पंचायत समिती सदस्य संग्राम पवार, युवा नेते उमेश मोहिते, कराड तालुका खरेदी-विक्री संघाचे अध्यक्ष अनिल मोहिते, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मिलिंद मोहिते यांच्यासह शिक्षक, पालक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

दरम्यान, शाळेच्या माजी विद्यार्थ्यांनी शाळेला प्रिंटर भेट देत आपल्या जुन्या शाळेबद्दलची कृतज्ञता व्यक्त केली. माजी विद्यार्थ्यांचा हा उपक्रम उपस्थितांच्या कौतुकाचा विषय ठरला. सरसेनापती हंबीरराव बाजी मोहिते यांच्या ऐतिहासिक वारशाने समृद्ध असलेल्या तळबीड गावातील ही शाळा गेल्या १७० वर्षांपासून अनेक पिढ्यांना शिक्षण देत आहे. त्यामुळे शाळेचा १७० वा वाढदिवस हा केवळ एक कार्यक्रम न ठरता, शाळेशी जोडलेल्या आठवणी, संस्कार आणि भावनिक नात्यांचा उत्सव ठरला.

# येरफळेच्या युवकांनी निर्माल्य संकलनातून दिला स्वच्छतेचा संदेश

**पाटण (हॅलो न्यूज)**

गणेश विसर्जनावेळी नदी व जलस्रोतांचे प्रदूषण रोखण्यासाठी येरफळे येथील युवकांनी पुढाकार घेत निर्माल्य संकलनाचा पर्यावरणपूरक उपक्रम राबविला. ग्रामपंचायत येरफळे, गावातील सर्व गणेश मंडळे, बचत गटातील महिला तसेच सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांच्या सहकार्याने हा उपक्रम उत्साहात पार पडला.



गणेश विसर्जनासाठी येणाऱ्या भाविकांकडून फुले, हार, दुर्वा व पूजासाहित्य संकलित करण्यात आले. निर्माल्य नदीत विसर्जित न करता स्वतंत्रपणे जमा करण्याचे आवाहन युवकांनी भाविकांना केले. या आवाहनाला ग्रामस्थ व गणेशभक्तांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या प्रमाणात निर्माल्य संकलनासाठी दिले.

* Satara * Vol- 18 * Isshu- 1 * Marathi * Weklly * Page- 4 * Prise Rs- 3/- * PRGI. MHMAR/26/A3624

साप्ताहिक हॅलो न्यूज (PRGI. MHMAR/26/A3624) हे मराठी पत्रक मालक, प्रकाशक, संपादक विशाल वामन पाटील यांनी मुद्रक सचिन काशिनाथ पाटील यांच्या राजमुद्रा ऑफसेट, २३३, सूर्या कॉम्प्लेक्स कराड, जि. सातारा येथे छापून (मुद्रीत) साप्ताहिक हॅलो न्यूज मुख्य कार्यालय २०६/१, वार्ड नं- ४, मु. पो तांबवे, ता. कराड, जि. सातारा ४१५११४ येथून प्रकाशित केला. (या वृत्तपत्रातील प्रकाशित झालेल्या जाहीरातीसंदर्भात त्या त्या कार्यालयाशी / संस्थेची व्यक्तीश: संपर्क साधुन खात्री करुन पुढील व्यवहार करावा. वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या लेख, वृत्त किंवा इतर मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (काही वाद निर्माण झाल्यास कराड न्यायालया अंतर्गत)

Weekly Hello News publisher, Owner and Editor By Vishal Vaman patil has Printed Sachin kashinath Patil, Rajmudra offset, 233, Surya complex karad, Dist - Satara At published weekly Hello News Head office 206/1 ward no -4, At - Post Tambave, Tal - karad, Dist - Satara 415114

# स्वाभिमानीचे केंद्रीय मंत्र्याच्या निवासस्थानी २९ पासून बेमुदत धरणे आंदोलन

**कराड (हॅलो न्यूज)**

स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राजू शेट्टी यांनी कराड येथे सह्याद्री सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन बाळासाहेब पाटील व कृष्णा सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन डॉ. सुरेश भोसले यांची भेट घेतली. यावेळी चालू वर्षी केंद्र व राज्य सरकारने राज्यातील साखर कारखाने १५ ऑक्टोंबर पासून सुरू करण्याचा निर्णय घेतलेला आहे. यावर्षी पाऊस काळ अत्यंत कमी झाल्याने उसाची हवी तेवढी वाढ झालेली नाही. त्याचबरोबरीने ऊस पिकाची परिस्थिती गंभीर असून सध्याच्या ऊस उत्पादनावर याचा मोठा परिणाम होत असल्याचे दिसून येत आहे. यामुळे यावर्षी साखर कारखाने जास्तीत जास्त ८५ ते ९० दिवस चालतील गळीत हंगाम चालेल एवढ्याच ऊस उत्पादन होण्याची शक्यता आहे.



यामुळे राज्य सरकारला १५ ऑक्टोंबर पासून साखर कारखाने चालू करायचे झाल्यास रिकव्हरी व वजन घट होवू लागल्याने ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे सर्वाधिक नुकसान होणार आहे. त्याचबरोबर यावर्षीच्या सरासरी रिकव्हरीच्या आधारे पुढिल हंगामाचा एफ आर पी ठरवला जातो त्यामुळे पुढील हंगामात ऊस दाराला फटका बसणार आहे.

उस उत्पादक शेतकरी व साखर उद्योग संकटातून बाहेर काढण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली आहे. या साखर व इथेनॉलच्या दरात केंद्र सरकारने मागणीप्रमाणे वाढ केली तर शेतकऱ्यांना त्यांच्या ऊसाला जवळपास ५०००/- रुपयांपर्यंत प्रति टन दर मिळू शकेल

या सर्व मागण्यांवर स्वाभिमानी शेतकरी संघटना व कर्नाटक राज्य रयत संघ यांचेवतीने २९ सप्टेंबर पासून केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी यांच्या हुबळी येथील निवासस्थानी बेमुदत धरणे आंदोलन करण्यात येणार आहे.

याकरिता राज्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या बरोबर साखर कारखानदार यांनीही या आंदोलनास सहकार्य करण्याची मागणी करण्यात आली.

या बैठकीस कराड तालुक्यातील स्वाभिमानी पक्षाचे जिल्हाध्यक्ष देवानंद पाटील, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष दादासाहेब यादव, स्वाभिमानी शेतकरी संघटना कराड उत्तरचे तालुकाध्यक्ष प्रमोदसिंह जगदाळे, स्वाभिमानी शेतकरी संघटना कराड दक्षिणचे तालुकाध्यक्ष बापूराव साळुंखे, स्वाभिमानी पक्षाचे कराड दक्षिणचे तालुकाध्यक्ष रामचंद्र साळुंखे व सर्व पदाधिकारी कार्यकर्ते व शेतकरी उपस्थित होते.



# ‘सह्याद्रि’ला राष्ट्रीय पातळीवरील ‘उत्कृष्ट ऊस विकास’ पुरस्कार

**कराड (हॅलो न्यूज)**

नॅशनल फेडरेशन ऑफ को-ऑपरेटिव्ह शुगर फॅक्टरीज लि., नवी दिल्ली यांच्या वतीने आयोजित राष्ट्रीय कार्यक्षमता पुरस्कार २०२४-२५ नुकताच प्रदान करण्यात आला. यामध्ये सह्याद्रि सहकारी साखर कारखान्यास उच्च साखर उतारा गटामध्ये देशपातळीवरील तृतीय क्रमांकाचा उत्कृष्ट ऊस विकास पुरस्कार २०२४-२५ प्रदान करण्यात आला.

हा पुरस्कार भारताचे केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री मा. ना. नितीनजी गडकरी यांच्या शुभहस्ते तसेच नॅशनल फेडरेशन ऑफ को-ऑपरेटिव्ह शुगर फॅक्टरीज लि., नवी दिल्लीचे अध्यक्ष मा. श्री. हर्षवर्धन पाटील व सहकार मंत्री मा. ना. बाबासाहेब पाटील, सहकार मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रदान करण्यात आला. सह्याद्रि सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन तथा राज्याचे माजी सहकार व पणन मंत्री मा. श्री. बाळासाहेब पाटील यांनी कारखाना सभासद व संचालक मंडळाच्या वतीने हा पुरस्कार स्वीकारला.

सह्याद्रि सहकारी साखर कारखान्याला मिळालेला हा राष्ट्रीय सन्मान म्हणजे कारखान्याचे ऊस उत्पादक सभासद, संचालक मंडळ, अधिकारी, कर्मचारी तसेच ऊस तोडणी व वाहतूकदार यांच्या सामूहिक कष्टांचे फळ असल्याची भावना यावेळी चेअरमन श्री बाळासाहेब पाटील यांनी व्यक्त केली.



# कन्याशाळा मलकापूरची श्रावण सहल २०२६ उत्साहात संपन्न

## कोयना जलविद्युत प्रकल्प, ओझर्डे धबधबा व नेहरू उद्यानाला दिली भेट

**मलकापूर (हॅलो न्यूज)**

श्री मळाईदेवी शिक्षण संस्थेच्या कन्याशाळा, मलकापूर येथील इयत्ता ५ वी ते १० वीच्या विद्यार्थिनींसाठी आयोजित करण्यात आलेली श्रावण सहल २०२६ अत्यंत उत्साहात व आनंदी वातावरणात पार पडली. या सहल द्वारे कोयना जलविद्युत प्रकल्प, ओझर्डे धबधबा आणि नेहरू उद्यान या पर्यटनस्थळांवर जाऊन निसर्गरम्य वातावरणाचा आनंद घेत शैक्षणिक अनुभूती विद्यार्थिनींना देता आली.

सहलीदरम्यान विद्यार्थिनींनी कोयना धरण भिंतीवर जाऊन कोयना जलविद्युत प्रकल्प आणि कोयना धरणाचा इतिहास समजून घेतला. ज्यामुळे विद्यार्थिनींना प्रत्यक्ष ज्ञानार्जनाचा एक वेगळाच आनंद घेता आला. याशिवाय ओझर्डे धबधबा आणि नेहरू उद्यान येथील निसर्गरम्य वातावरणाचा विद्यार्थिनींनी मनमुराद आनंद लुटला.

सहली दरम्यान संस्थेचे विशांत थोरात, विनायक थोरात, सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाचे पीएसआय बाबुराव कदम यांनी विद्यार्थिनींना ओझर्डे धबधबा व नेहरू उद्यान याबद्दल सविस्तर माहिती देऊन सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक काळजी घेण्याचे मार्गदर्शन केले.

या सहलीसाठी शाळेच्या मुख्याध्यापिका सुलोचना भिसे, पर्यवेक्षिका करूणा शिके यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षिका आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे महत्त्वपूर्ण योगदान व सहकार्य लाभले.

# पर्यावरणपूरक गणपती उत्सवातून नारायणवाडीचा स्वच्छतेचा संदेश

**काले (हॅलो न्यूज)**

पर्यावरणाचे संरक्षण, नदीचे प्रदूषण रोखणे आणि गणेशभक्तांमध्ये स्वच्छतेविषयी जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने पर्यावरणपूरक गणपती उत्सव २०२६ अंतर्गत नारायणवाडी ग्रामपंचायतीच्या वतीने गणपती विसर्जन काळात विशेष निर्माल्य संकलन उपक्रम राबविण्यात आला. पाचवडेश्वर मंदिर घाट येथे निर्माल्य कुंड ठेवून भाविकांकडून निर्माल्य संकलित करण्यात आले.

ग्रामपंचायत अधिकारी पी. एम. माळी, गावचे ज्येष्ठ नागरिक जालिंदर यादव, तसेच ग्रामपंचायत कर्मचारी यांच्या माध्यमातून हा उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात आला. गणेशभक्तांनीही या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत निर्माल्य नदीपात्रात न टाकता ग्रामपंचायतीने ठेवलेल्या निर्माल्य कुंडात जमा केले. या उपक्रमातून तब्बल ६ घंटागाडी डम्पर निर्माल्याचे संकलन करण्यात आले. त्याचबरोबर अंदाजे ३० किलो फळे तसेच २० ते २५ किलो प्लास्टिक संकलित करण्यात आले. त्यामुळे मोठ्या प्रमाणातील निर्माल्य, फळे व प्लास्टिक नदीत जाण्यापासून वाचून नदीचे प्रदूषण रोखण्यास मदत झाली.



> निर्माल्य नदीत नाही, कुंडातच जमा करूया; पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करूया!
> **– ग्रामपंचायत नारायणवाडी, ता. कराड**

स्वच्छ गाव सुंदर गाव, निर्मळ नदी निरोगी जीवन या संकल्पनेतून राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे ग्रामस्थांसह सर्व स्तरातून कौतुक होत आहे. विशेष म्हणजे, नारायणवाडी ग्रामपंचायतीने मुख्यमंत्री समृद्ध पंचायत अभियान अंतर्गत पुरस्कार प्राप्त करून गावाच्या विकासाची व स्वच्छतेची वेगळी ओळख निर्माण केली आहे. पर्यावरण संवर्धन, स्वच्छता, लोकसहभाग आणि शाश्वत ग्रामविकासाच्या दिशेने ग्रामपंचायतीकडून सुरू असलेल्या विविध उपक्रमांना या यशामुळे अधिक बळ मिळाले आहे.

# ‘स्वच्छ भारत मिशन’ अंतर्गत ‘स्वच्छता हीच सेवा’ अभियांनार्गत विद्यार्थ्यांनी केली जनजागृती

**पाटण (हॅलो न्यूज)**

स्वच्छ भारत मिशन अंतर्गत स्वच्छता हीच सेवा अभियानाच्या निमित्ताने मोरणा शिक्षण संस्थेच्या शिवाजीराव देसाई विद्यालय सोनवडे येथे विविध स्वच्छता उपक्रम राबविण्यात आले. विद्यार्थ्यांनी शाळा परिसर तसेच परिसरातील सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता करून स्वच्छतेचे महत्त्व अधोरेखित केले.

या अभियानादरम्यान विद्यार्थ्यांनी हातात झाडू घेऊन शाळा परिसराची स्वच्छता केली. परिसरातील कचरा गोळा करून त्याची योग्य विल्हेवाट लावण्यात आली. तसेच प्लास्टिकचा वापर टाळणे, कचरा कचरापेटीतच टाकणे, निंबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा तसेच ओला व सुका कचरा वेगळा करणे आणि परिसर स्वच्छ ठेवण्याबाबत जनजागृती करण्यात आली.

स्वच्छता ही केवळ एका दिवसाची मोहीम नसून ती प्रत्येकाची जबाबदारी आहे, असा संदेश विद्यार्थ्यांनी आपल्या कृतीतून दिला. स्वच्छ व सुंदर परिसरासाठी प्रत्येकाने स्वच्छतेची सवय अंगीकारावी, असे आवाहन यावेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री.शरद शेजवळ सर यांनी केले.

# आदर्श विद्यालय पुरस्कार सोहळा उत्साहात संपन्न

**मलकापूर (हॅलो न्यूज)**

श्री मळाईदेवी शिक्षण संस्था,मलकापूर आयोजित आदर्श विद्यालय पुरस्कार सोहळा २०२६ अत्यंत उत्साही आणि प्रेरणादायी वातावरणात पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव शेतीमित्र अशोकराव थोरात हे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून पथक पर्यवेक्षण प्रमुख शरदराव चव्हाण सर उपस्थित होते.

संस्थेच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील उत्कृष्ट कामगिरीबद्दल विविध गटांत प्रथम क्रमांक पटकावणाऱ्या खालील शाळांना आदर्श विद्यालय पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

आदर्श विद्यालय पुरस्कार विजेत्या शाळा

शिशु गट: प्रथम क्रमांक आदर्श शिशुविहार, मलकापूर

पूर्वप्राथमिक गट (इ. १ ली ते ४ थी): प्रथम क्रमांक स्टार इंग्लिश मिडियम, मलकापूर

प्राथमिक गट (इ. ५ वी ते ७ वी): प्रथम क्रमांक आदर्श प्राथमिक विद्यालय, आगाशिवनगर

माध्यमिक गट (इ. ८ वी ते १० वी): प्रथम क्रमांक ना. आनंदराव चव्हाण विद्यालय, पोतले

उच्च माध्यमिक गट (इ. ११ वी व १२ वी): प्रथम क्रमांक आदर्श जुनिअर कॉलेज, मलकापूर

या सोहळ्यास श्री मळाईदेवी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. भास्करराव पाटील, उपाध्यक्ष मा. वसंतराव चव्हाण गुरुजी, खजिनदार मा. तुळशीराम शिर्के, संचालक मा. पवन पाटील, माजी पथक पर्यवेक्षण प्रमुख आर. ए. कुंभार, डॉ. सी. बी. कुंभार यांच्यासह प्रमुख मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुरेखा खंडागळे यांनी केले, तर आभार मुख्याध्यापिका सुलोचना भिसे यांनी मानले.



# कराडला एस पी ग्रुपकडून ना नफा ना तोटा तत्वावर रूग्णवाहिका

## मंत्री शंभूराज देसाई यांच्या हस्ते लोकार्पण

**कराड (हॅलो न्यूज)**

तांबवे येथील उद्योजक सचिन पवार, संदिप पवार यांच्याकडून ना नफा ना तोटा या तत्वावर रूग्णांसाठी उपलब्ध करून दिलेल्या रूग्णवाहिकेचे लोकार्पण पालकमंत्री शंभूराज देसाई यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच गणेश विसर्जना निमित्त तांबवे येथील कोयना पूलाजवळ महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

सचिन पवार आणि संदिप पवार या दोन बंधूनी गणपती विसर्जनानिमित्त आयोजित महाप्रसादाला मोठा प्रतिसाद मिळाला. सकाळी १० वाजता महाप्रसाद वाटपास सुरूवात करण्यात आली. तब्बल १० हजारांहून अधिक गणेश भक्तांनी या महाप्रसादाचा लाभ घेतला. सायंकाळी ७ वाजता राज्याचे पर्यटनमंत्री व सातारा जिल्ह्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई यांच्या उपस्थित गणेश भक्तांना महाप्रसाद वाटप करण्यात आले.



मंत्री शंभूराज देसाई म्हणाले, कराड व पाटण तालुक्यातील डोंगरी विभागात रस्ते पोहचले असले तरी रूग्णांना लवकरात लवकर पोहचण्यासाठी रूग्णवाहिका वरदायिनी ठरत आहेत. ग्रामीण भागातील लोकांना कमी खर्चात रूग्णवाहिका उपलब्ध करून एस पी ग्रुप आणि सचिन पवार यांनी सामाजिक काम केले आहे. प्रत्येक माणसाचा जीव त्याच्या कुटुंबियासाठी अत्यंत महत्वाचा असतो, तेव्हा अडचणीच्या काळात आधार देण्यासाठी ही रूग्णवाहिका बहुमोल कार्य करेल, असा मला विश्वास आहे.

यावेळी एस. पी. ग्रुपचे सदस्य, पदाधिकारी उपस्थित होते.



# इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ आर्किटेक्ट्स कराड केंद्राची नवीन कार्यकारिणी बिनविरोध

**कराड (हॅलो न्यूज)**

इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ आर्किटेक्ट्सच्या कराड केंद्राच्या नवीन कार्यकारिणीची निवड नुकतीच खेळीमेळीच्या वातावरणात बिनविरोध पार पडली.

अध्यक्षा म्हणून आर्किटेक्ट प्रियदर्शिनी देसले, उपाध्यक्षा म्हणून आर्किटेक्ट प्रियांका कणसे सचिव म्हणून आर्किटेक्ट प्रमील प्रकाश पाटील आणि कोषाध्यक्ष म्हणून आर्किटेक्ट नईम वायकर यांची निवड करण्यात आली. तसेच कार्यकारी समिती सदस्य म्हणून आर्किटेक्ट सिद्धिराज देसाई,

आर्किटेक्ट कैलाश पाटील आणि आर्किटेक्ट क्षितिजा सिद्धिराज देसाई यांची बिनविरोध निवड झाली.

कराड व मलकापूर नगरपालिका क्षेत्राच्या नियोजित व शाश्वत विकासासाठी नवीन कार्यकारिणीच्या माध्यमातून सक्रियपणे काम करण्यात येणार आहे. नगररचना, विकास आराखडा तसेच बांधकाम क्षेत्राशी संबंधित विषयांमध्ये नगरपालिका प्रशासनासोबत समन्वय साधून आर्किटेक्ट्सना आवश्यक सहकार्य देण्याचा प्रयत्न राहणार आहे. तसेच आर्किटेक्ट्सना येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी आणि कामकाज अधिक सुलभ, पारदर्शक व ऑनलाइन पद्धतीने होण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहेत.

यावेळी नवनिर्वाचित अध्यक्षा आर्किटेक्ट प्रियदर्शिनी देसले यांनी सांगितले की, नवीन कार्यकारिणीसमोर येणारी विविध आव्हाने आम्ही एक संघ म्हणून स्वीकारून सकारात्मक पद्धतीने काम करू.







**कराड** : येथे विसर्जन मिरवणुकीमध्ये सहभागी कांतारातील आकर्षक प्रतिकृती. दुसऱ्या छायाचित्रात हत्ती व घोडे. तिसऱ्या छायाचित्रात कृष्णा नदीमध्ये गणेशमूर्तीचे विसर्जन करताना कार्यकर्ते.



कराड शहर गणराया ॲवार्ड समिती व कराड नगरपरिषद यांच्यावतीने गणेश मंडळांचे स्वागत करण्यात आले. यावेळी पालकमंत्री शंभूराज देसाई, माजी सहकार मंत्री बाळासाहेब पाटील, नगराध्यक्ष राजेंद्रसिंह यादव, उपनगराध्यक्ष प्रतापराव साळुंखे, विरोधी पक्षनेते विजय वाटेगावकर व इतर



कराड दक्षिणचे आमदार डॉ. अतुलबाबा भोसले यांनी वैभव माने यांच्यासोबत बुलेटवरून फेरफटका मारत कराड शहरातील मंडळांना भेटी देत विसर्जन मार्गाची पाहणी केली.



गणपती बाप्पा मोरया...गणेश भक्तांची गैरसोय होवू नये, यासाठी गाड्यांच्या ताफा बाजूला ठेवून पालकमंत्री शंभूराज देसाई यांना बुलेटवरून विसर्जन मिरवणुकीसाठी नगराध्यक्ष राजेंद्रसिंह यादव यांनी फेरफटका मारला.











१) कराड उत्तर विधानसभा मतदार संघातील गणेश मंडळांना भाजपाचे किसान मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष रामकृष्ण वेताळ यांनी भेटी दिल्या.

२) कराड उत्तरचे आमदार मनोजदादा घोरपडे यांनी गणेश मंडळांना भेटी दिल्या.

३) चावडी चौक येथे गणेश भक्तांनी केलेली गर्दी

४) पर्यावरण बचाव संदेश : कराड दक्षिणचे आमदार डॉ. अतुलबाबा भोसले यांनी जलकुंडात गणेश मूर्तीचे विसर्जनस्थळी गणेश भक्तांची भेट घेतली.

५) कराड शहरात गणपती विसर्जनाला रणजीत पाटील नाना मित्र परिवार आयोजित महाप्रसादाला सिक्कीमचे माजी राज्यपाल श्रीनिवास पाटील यांनी भेट दिली.